# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

। ,००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २४/०३/२०२०

### जिल्हा : पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३४.० ते ३७.६ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १४.२ ते २०.९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ३७ ते ६५ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १७ ते ३० टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी __ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** या आठवडयात पुणे जिह्यात कमाल तापमान ३५ ते ३७ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १७ ते १९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ७१ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ३८ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ४ ते ६ कि.मी. दरम्यान राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा आग्न्येयेकडून वायव्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (१९/०३/२०२० ते २५/०३/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२७/०३/२०२० ते ३१/०३/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **19** | **20** | **21** | **22** | **23** | **24** | **25** | दिनांक | **28** | **29** | **30** | **31** | **1** |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 1.0 | पाऊस (मिमी) | 27 | 21 | 17 | 18 | 3 |
| 37.0 | 36.1 | 34.0 | 34.6 | 36.2 | 36.8 | 37.6 | कमाल तापमान (अं.से.) | 36 | 35 | 36 | 36 | 37 |
| 15.0 | 14.3 | 14.2 | 17.6 | 17.7 | 19.3 | 20.9 | किमान तापमान (अं.से.) | 17 | 18 | 19 | 18 | 18 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 45 | 37 | 42 | 65 | 51 | 60 | 65 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 74 | 74 | 73 | 73 | 63 |
| 22 | 17 | 25 | 22 | 26 | 24 | 30 | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 41 | 40 | 39 | 39 | 31 |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 5 | 5 | 4 | 4 | 6 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 52 | 95 | 180 | 267 | 259 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २७ व २८ मार्च २०२० रोजी तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट व सोसाटयाच्या वा-यासह (वा-याचा वेग ताशी ३० – ४० किमी ) व पावसाची शक्यता तसेच दिनांक २९ मार्च २०२० रोजी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व सोसाटयाच्या वा-यासह (वा-याचा वेग ताशी ३० – ४० किमी ) व गारांचा पाऊस काही ठिकाणी पडण्याची शक्यता असून दिनांक ३० मार्च २०२० रोजी तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाट व सोसाटयाच्या वा-यासह (वा-याचा वेग ताशी ३० – ४० किमी ) व पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | तुरळक ठिकाणी पाऊसाची शक्यता असल्याने पक्व झालेली पिके ज्वारी, हरभरा, गहू इत्यादींची काढणी करुन घ्यावी. काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. मळणी करणे शक्य नसल्यास, काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या झाकून ठेवावीत. जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत. पाऊसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे. पावसाचा अंदाज बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| Covoid 19 ya संसर्गजन्य आजार पासून रक्षण | | **Covid-19** या संसर्गजन्य आजारापासून संरक्षण करण्यासाठी खोकला, ताप, डोकेदुखीची लक्षणे असल्यास **mohfw.gov.in**, **who.int** नुसार ने दिलेली स्वास्थ्य संबंधित काळजी घ्या. वर सांगितलेल्या आजाराची लक्षणे कायम राहिल्यास तोंडास मास्क लावा, शेताच्या कामादरम्यान लोकांमध्ये संपर्क टाळण्यासाठी **3-5** फूट अंतर ठेवा समुदायामध्ये जवळजवळ एकत्र येऊ नका. अशा आजाराची लक्षणे आणि योग्य आरोग्य सेवेसाठी संशयित प्रवासाचा इतिहास असलेल्या लोकांना टाळण्यासाठी, त्यांना योग्य तपासणी आणि साफसफाईचा सल्ला द्या. सॅनिटायझरने हात धुवा आणि हातचे हातमोजे वापरा, उघड्या हातांनी सार्वजनिक ठिकाणी दूषित होण्याचे स्त्रोत असलेल्या कोणत्याही गोष्टीस स्पर्श करु नका आणि हात वारंवार साबणाने धुवून सॅनिटायझर वापरा. सार्वजनिक ठिकाणी गुटखा खावून थुंकणे, कफ टाकणे, उघडे खुले शिंकने टाळा तोंडावर रुमाल धरा आणि कोरोना **Covid-19** प्रसार रोख्यासाठी प्रशासनास मदत करा. आपल्या, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी हात धुवा, स्वच्छता राखा, प्रवास टाळा आणि स्वतःची काळजी घ्या. |
| रब्बी ज्वारी | पक्वता ते काढणी अवस्था | पक्व झालेल्या ज्वारी पिकाची काढणी करावी. काढणी केलेली कणसे उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठवणुकी पूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी. |

| | | |
|---|---|---|
| गहू | पक्वता ते काढणी अवस्था | गहू पिकाची कापणी पिक पक्व होण्याच्या २-३ दिवस आधी करावी त्यामुळे गव्हाचे दाने शेतात झडण्याचा प्रकार टाळता येईल. कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ % किंवा कमी असावे. |
| भुईमुग | पिक वाढीची अवस्था | भुईमुग पिक पेरणीनंतर ४० दिवसांपर्यंत तण विरहीत ठेवावे त्यासाठी वेळोवेळी कोळपणी व खुरपणी करावी. उन्हाळी भुईमुगास जमिनीच्या मगदूरा प्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. भुईमूगाच्या आ-या जमिनीत जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करु नये. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. टिक्का रोग नियंत्रणासाठी मॅंकोझेब २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यातून फवारावे. |
| हरभरा | काढणी अवस्था | हरभरा पिक ओलसर असताना काढणी करू नये. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभऱ्याची काढणी करून मळणी करावी. हरभरा पिक काढणी व मळणीनंतर धान्यास ६-७ दिवस कडक उन द्यावे. कीड लागू नये म्हणून हरभरा कोठीत साठवणूक करताना त्यामध्ये कडूलिंबाचा पाला (५ टक्के) घालावा. |
| भाजीपाला | पिक वाढीची अवस्था | भेंडी, वांगी, भोपळा इ. भाजीपाला पिकावरील रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची किंवा फिप्रोनिल २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच भाजीपाला पिकावरील कोळीच्या नियंत्रणासाठी फेनप्रोप्ॅथ्रीन ३०% ई.सी., ५ मिली किंवा डायकोफॉंल १८.५% ई.सी., २० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| मिरची | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे मिरची पिकावर चुरडा-मुरडा: हा विषाणूजन्य रोग पांढरी माशी व फुलकिडे या किडींमार्फत होऊ शकतो. यामध्ये पिकांची पाने बारीक वाकडी होऊन सुरकुत्या पडल्यासारखी निस्तेज दिसतात. त्यामुळे झाडांची वाढ खुंटते. आवश्यकतेनुसार पांढरी माशी नियंत्रणासाठी पिवळे तसेच फुलकिड्यांसाठी निळे चिकट सापळे वापरावेत. रासायनिक कीडनाशकांचा वापर करावयाचा झाल्यास फुलकिडे नियंत्रणासाठी फिप्रोनील (५ ई.सी.) १५ मिली किंवा स्पिनोसॅड (४५ ई.सी.) ४ मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| टोमॅटो | फळ धारण अवस्था | टोमॅटो वरील फळे पोखरणारी अळी – ही अळी प्रथम पाने खाते व नंतर हिरवी किंवा पिकलेली फळे पोखरून आत शिरते व गर खाते या किडीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ % ईसी २० मिली किंवा नोव्हॅलीरॉन १० % ईसी १५ मिली किंवा क्लोरॅनट्रॅनीप्रोल १८.५% एस.सी ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून ८ ते १० दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या कराव्यात. |
| कांदा | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे कांदा पिकावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५; २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कांदा पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३०% प्रवाही १५ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% प्रवाही ६ मिली या किटकनाशकांच्या प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| कलिंगड/ खरबूज | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानातल्या अधिकतम आणि नुन्यतम तापमानातील तफावतीमुळे नाग अळीच्या नियंत्रणासाठी प्रोफेनोफोस २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. तसेच फळ माशीच्या नियंत्रणासाठी क्यू लुरचे एकरी ५ सापळे लावावेत. |
| आंबा | मोहोर | सध्याच्या हवामानामुळे आंब्यावर भुरी रोगाचा तसेच तुडतुडे यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. त्यासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल., ३ मिली + पाण्यात विरघळणारे गंधक (सल्फर) ८०% डब्ल्यू.पी., २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.<br>केशर आंब्यामध्ये उभयलिंगी फुलांचे प्रमाण, फुलधारणा आणि उत्पादन वाढविण्यासाठी १ % पोटॅशिअम डायहायड्रोजन फॉस्फेट (१०० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात) मोहर फुटण्याच्या वेळी आणि त्यानंतर १ महिन्याने १ % पोटॅशिअम नायट्रेटची (१०० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात) फवारणी करावी. तसेच गावठी व अनुत्पादित आंब्यांच्या झाडाचे सुधारित जातीत रुपांतर करण्यासाठी नविन फुटव्यावर फेब्रुवारी, मार्च महिन्यात केसर वाणांचे कलम करावे. |
| डाळिंब | तेलकट डाग रोग नियंत्रण | तेलकट डाग रोग नियंत्रणासाठी फळांच्या तोडणीनंतर लगेच मुख्य छाटणी करावी तसेच शिफारशीप्रमाणे झाडांना खतांची संतुलित मात्रा देवून झाडांना विश्रांती द्यावी. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासून झाडांची नैसर्गिकरीत्या पानगळ होई पर्यंत ताण द्यावा (बहार). |
| द्राक्ष्य | मणी वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानातल्या अधिकतम आणि नुन्यतम तापमानातील तफावतीमुळे द्राक्ष्यबागेतील पिठ्या ढेकणाच्या नियंत्रणासाठी बुप्रोफेझीन २५ % एस सी १५ मिली अथवा व्हरटीसिलीयम लेक्येनि ५० ग्राम + ५० मिली दुध १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | उन्हाळी हंगामात जनावराना हिरवा ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून पाणी उपलब्धतेनुसार ज्वारी किंवा बाजरी किंवा मका या चारा पिकांची लागवड करावी. जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. तसेच जनावरांना नेहमी पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. जनावरे सावलीमध्ये बांधावीत. सर्व निरोगी जनावरांना लाळ खुरकत रोगाची प्रतिबंधक लस मार्च महिन्यामध्ये टोचून घ्यावी. उन्हाळ्याच्या सुरवातीस मार्च महिन्यामध्ये मेंढ्यांना देवी या रोगाची प्रतिबंधक लस टोचून घ्यावी. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा, कृ.म.वि., पुणे

ठिकाण : कृ.म.वि., पुणे.
दि. : २७.०३.२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**